# University of Mumbai

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.

**क्र. परीक्षा / पूनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/७६७ /२०१९**

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक आपल्या निदर्शनास आणून देते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा / पूनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ४९० /२०१९ दि. ०४ जून, २०१९ अन्वये, प्रथम सत्र २०१९ मध्ये T.Y.B.Com (Sem-VI) (Choice Based) या अभ्यासक्रमाच्या ज्या दोन विषयांची परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे; या विषयांसाठी विद्यार्थ्यांच्या विनंती अर्जाप्रमाणे उत्तपत्रिकांचे पुर्नमुल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुर्नमुल्यांकनात प्राप्त गुणांच्या यादया दि. ०५/०७/२०१९ पर्यंत पुनर्मुल्याकन व छायांकित कक्षात हस्तपोच सादर कराव्यात असे अवगत करण्यात आले होते.

तरी ज्या महाविद्यालयांनी अदयापही उपरोक्त प्रमाणेच्या गुणांच्या यादया सादर केल्या नसतील; अश्या महाविद्यालयांसाठी एक शेवटची संधी म्हणून व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, उपरोक्त प्रमाणेच्या यादया सादर करण्यासाठी दि. १७/०७/२०१९ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त तारखेपर्यंत गुणांच्या यादया पुनर्मुल्याकन व छायांकित कक्षात हस्तपोच सादर करावयात.

दि. १७/०७/२०१९ नंतर गुणांच्या यादया स्वीकारल्या जाणार नाहीत व यामुळे भविष्यात काही तांत्रिक/ प्रशासकीय / न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास यांस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०९ जुलै, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक